ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महात्मा गांधी आणि स्त्रीवाद

**डॉ. भारती नवथर**
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
राहुरी, जिल्हा अहमदनगर

★★★

**सारांश** – स्त्रियांचा सामाजिक दर्जा व स्थान उंचावण्यासाठी गांधीजींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. २० व्या शतकात स्त्रीहक्क व स्त्री स्वातंर्त्र्यासाठी अनेक आंदोलने झाली. स्त्रीवादी चळवळी अनेकदा पुरुषांच्या पुढाकाराने विकसित झालेल्या दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी महात्मा गांधींनी बजावलेल्या भूमिकेचे स्वरूप, त्याची फलश्रुती यावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गांधीजींनी केवळ राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली असे नाही तर समाजकारणातील त्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे . तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये बंदिस्त केले होते. स्त्रियांचे हक्क नाकारले होते. बालविवाह, हुंडा, पडदा पद्धती, सती, विधवा पुनर्विवाहावर बंदी, स्त्री – पुरुष असमानता यामुळे स्त्रियांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत महात्मा गांधींनी लेखनाद्वारे , भाषणाद्वारे बालविवाह विधवा पुनर्विवाहबंदी, पडदा पद्धती, सती, हुंडा या विरोधी जागृती करुन , स्त्री शिक्षण, स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करुन स्त्रियांना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र आंदोलनात सहभागी करून घेऊन राष्ट्रीय आंदोलन खर्‍या अर्थाने व्यापक बनविले.

**बीजशब्द** :– बालविवाह, विधवा पुनर्विवाह,पडदा पद्धती, हुंडा,सती, स्त्रीशिक्षण, स्त्रीवाद, स्वातंत्र चळवळ.

**उद्दिष्टे** :– १) स्त्रिवादाचा अर्थ जाणून घेणे. २) विसाव्या शतकातील अनिष्ठ रूढी परंपरांवर विषयी महात्मा गांधीजींचे विचार जाणून घेणे ३) महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर प्रकाश टाकणे. ४) महात्मा गांधीजींच्या स्त्री–पुरुष समानतेच्या पुरस्कारावर प्रकाश टाकणे.

**गृहितके**– १) स्त्रियांच्या उन्नतीत महात्मा गांधीजींची भूमिका उल्लेखनीय आहे. २) स्त्रियांवर होणारा अन्याय कमी होऊ लागला. ३) महात्मा गांधींच्या स्त्रीवादी भूमिकेमुळे भारतीय स्वातंत्र लढ्यात स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्याचे दिसून येते ४) महात्मा गांधीजींचा महिला विषयी दृष्टिकोन मानवतावादी आहे.

५) महात्मा गांधींची स्त्री–पुरुष समानतेची भुमिका महत्त्वपूर्ण आहे.

**संशोधन पद्धती**– प्रस्तुत शोध निबंध साठी माहिती संकलन, वर्णनात्मक, विश्लेशणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**व्याप्ती व मर्यादा**– महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंर्त्र्य आंदोलनातील योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे येथे महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेचाच विचार केला आहे.

**विषयज्ञान** – स्वतःच्या हक्कासाठी, मुक्तीसाठी झालेल्या स्त्रियांच्या चळवळीला स्त्रिवाद असे संबोधले जाते. स्त्रिवाद म्हणजे स्त्रीला स्वतःच्या शक्तीचे आलेले भान होय. एका बाजूने अन्याय, अत्याचार शोषण याखाली दडपण्याचे भान आहे. दुसर्‍या बाजूला मानव जातीच्या प्रगतीमध्ये सहभागाचे भान, स्वतःची किंमत, स्वतःची अस्मिता यांचे भान म्हणजेच स्त्रीवाद जगाकडे नव्या चष्म्यातून पहाण्यास शिकणे म्हणजेच स्त्रीवाद अशा प्रकारे स्त्रीयांमधिल सुप्तशक्ती ओळखून तिला आवाहन करणारे अनेक महात्मे होऊन गेले. त्यापैकी महात्मा गांधींची स्त्रीवादी भूमिका महत्त्वपूर्ण आहे. महात्मा गांधीजींच्या कार्याचा परिणाम पुरुषा इतकाच स्त्रियांवरही झाला. गांधीजींच्या तत्वज्ञानात शारीरिक बळापेक्षा आत्मिक शक्तीला अधिक महत्त्व होते. स्त्रियांना हे मानण्यासारखे असल्याने गांधीजींच्या कार्यात स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या दिसून येतात. गांधीजींचे स्त्रीविषयक विचार हे अत्यंत जागृत होते. तत्कालीन समाजातील स्त्री ही असह्य आहे. याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच रुढी परंपरेने चालत आलेली स्त्रीची प्रतिमा बदलण्यासाठी अनिष्ट रूढी परंपरेत सुधारणा करावी याविषयी आपले विचार लेखनाद्वारे व भाषणाद्वारे स्पष्ट केले. प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**बालविवाह** – महात्मा गांधींनी यंग इंडिया आणि हरिजन या वृत्तपत्रांद्वारे तसेच भाषणाद्वारे बालविवाह, सती पद्धत, पडदा पद्धत ,देवदासी प्रथेला विरोध केलेला दिसून येतो. बालविवाहामुळे बाल विधवांचे प्रमाण वाढलेले दिसून येतात. बालविवाहाचा परीणाम स्त्रियांच्या शिक्षणावर होताना दिसून येतो. म्हणूनच महात्मा गांधींनी त्या विरोधी जागृती घडवून आणलेली दिसून येते.

**विधवाविवाह** – बालविवाहामुळे बालविधवांचे प्रमान वाढत होते. महात्मा गांधी आपल्या भाषणाद्वारे व लेखनाद्वारे सक्तीच्या वैधव्यापेक्षा विधवा विवाहाचा पुरस्कार करतात. सर्व व्यापक आणि उदार अशा हिंदू संस्कृतीने स्त्रियांना एवढा कनिष्ठ दर्जा द्यावा हे या संस्कृतीला शोभत नाही .ते म्हणतात सक्तीचे वैधव्य हा स्त्रीवर केलेला मोठा अन्याय आहे. या वैधव्याने इतर अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. समाजाची नीतीमत्ता घसरते. विधवा विवाहाला संमती न देणे आपल्या मनाच्या संकुचितपणाचे लक्षण आहे. भारतीय संस्कृ

ती उदात्त आहे. त्यात हा संकुचितपणा बसत नाही. म्हणूनच महात्मा गांधींचा विधवांना असा सल्ला होता की हिंदू लोकमताला न भिता त्यांनी पुनर्विवाह करावा.

**सती** – महात्मा गांधींनी मानवतावादी भूमिकेतून सती पद्धतीला विरोध केलेला दिसून येतो. ते म्हणतात सतीत्वाची भावना उच्च आहे. पवित्र आहे. पण त्यात विवेक नाही. स्त्रियांना ते म्हणतात तुम्हाला जर यथार्थ सहगमन करावयाचे असेल तर तुम्ही आपले उर्वरित जीवन पतीच्या अपूर्ण राहिलेल्या कार्याला अर्पण करा. तरच त्याची सहचारिणी होण्याचे श्रेय तुम्हाला मिळेल. सुखोपभोगाच्या सर्व साधनांचा त्याग करून अपरिग्रही होऊन प्रसादमय संन्याशाचा नवा आदर्श निर्माण करण्याचा संदेश ते भगिनींना करताना दिसून येतात. 3 महात्मा गांधींनी अहिंसा, ब्रह्मचर्याच्या शिकवणीने स्त्रियांना अभयदान दिले. गांधीजींना स्त्रियांना अबला समजणे हे मनापासून मान्य नव्हते म्हणूनच अबला म्हणवून घेणाऱ्या स्त्रीला पुरुशार्थाचा संदेश देतात. स्त्रीचे जीवन नव्या स्फूर्तीने आशा–आकांक्षांनी सजीव करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. म्हणूनच विधवाविवाह बद्दलची त्यांची मते स्त्रियांबद्दलच्या सुधारकी दृष्टिकोनाचे म्हणजेच स्त्रीवादी प्रवाहाचेच प्रतीक आहे.

**हुंडा**– महात्मा गांधी हुंडापद्धती विरोधी होते. त्यांच्यामते हुंडा पद्धती ही स्त्रीचा अपमान करणारी तिला गौण ठरवणारी पद्धत आहे. माणूस म्हणून स्रीचे मूल्य कमी करणारी अशी पद्धत आहे हुंड्याची पद्धत बंद व्हायला हवी. हुंडा प्रथेचा व जात बंदिस्तीचा संबंध स्पष्ट करुन त्यासाठी आंतरजातीय विवाह हाच उपाय असल्याचे मत गांधीजी सांगतात. जोपर्यंत एका विशिष्ट जाती समूहातील तरुण–तरुणी मधूनच निवड करायची आहे तोवर हुंडा पद्धतीला आधार राहील असे ते म्हणतात. विवाह वैयक्तिक बाब असली तरी आंतरराष्ट्रीय विवाहांना बंदी करता कामा नये ज्या विवाहातील एक पक्ष हरिजन नसेल त्या लग्नाला हजर राहायचे नाही किंवा आशीर्वाद द्यायचा नाही हेही यापूर्वीच ठरवले आहे आणि तसा नियम केला आहे असे ते नमूद करतात. म्हणूनच हुंडापद्धती नष्ट करण्यासंबंधी ते लिहितात मुला–मुलीचे निवडीचे क्षेत्र जोवर जातींनी मर्यादित राहील तोवर कितीही विरोध केला तरी हुंड्याची प्रथा टिकणारच. ती बंद व्हायची असेल तर मुला–मुलींना आणि त्यांच्या माता–पित्यांना ही जाति बंधने झुगारून द्यावी लागतील. मुलांना त्यांची पारंपरिक मनोरचना आमूलाग्र बदलेल असे शिक्षण दिले तरच हुंडाविरोधी आंदोलन यशस्वी होईल. जो तरुण हुंड्याच्या पापमय पैशाचा स्वीकार करेल त्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन समाजाला ते करतात. मुलीच्या माता पित्यांना संदेश देताना ते म्हणतात तुम्ही इंग्रजी पदव्यांचा मोह सोडलात तर ही प्रथा नष्ट होणारी आहे.

**स्त्रीशिक्षण** – स्त्री शिक्षणा बाबत गांधीजींचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. महात्मा गांधीजींच्या मते आत्मविष्काराचे साधन असणारे शिक्षण पुरुषांबरोबर स्त्रियांनाही मिळाले पाहिजे. स्त्री शिक्षणामुळे हुंडा, बालविवाह, पडदा पद्धती यासारख्या अनिष्ट प्रथा संपुष्टात येतील. स्त्रियांची पारतंर्त्यातून मुक्तता झाल्याशिवाय भारताला नैतिक ,भौतिक किंवा आत्मिक क्षेत्रात प्रगती करता येणार नाही. म्हणून गांधींनी शेवटी असा निष्कर्श काढला की स्त्रियांच्या पुनरुज्जीवनाचे शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे. स्त्रियांच्या संदर्भातील रुढी परंपरांवर टीका करताना पुरुष प्रधानतेवरही ते हल्ला करतात गांधीजी म्हणतात स्त्रीयांकरता जे नियम निव्वळ पुरुषांनी बनवले आहेत त्यामुळे निर्माण झालेल्या रुढी आणि नियम यांनी स्त्रियांवर जुलूमच चालविला आहे आणि हा जुलूम स्त्रिया केवळ अज्ञानामुळे सहन करताना दिसत आहे. स्त्रियांच्या शिक्षणाच्या अभावामुळे त्यांच्या मागासलेपणा मुळे आपल्या अनेक चळवळी असफल झालेल्या दिसतात अथवा त्यांना यश मिळत नसल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रीला शिक्षण देऊन सुविद्य केले पाहिजे यासाठी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरतात. पुरातन काळापासून चालत आलेल्या रुढीने स्त्रियांवर अन्यायाने हिनत्वाचा शिक्का मारला आहे. स्त्रीला आपली सखी, अर्धांगिनी, सहचारिणी मानण्याऐवजी पुरुषांनी तिला आपली भोगदासी बनविले आहे. स्त्रियांवर आजवर जो आन्याय झाला त्याची भरपाई करण्याकरता त्यांना शिकविणे हे आपले कर्तव्य आहे. स्त्रियांना शिक्षण देताना जे त्यांना उपयोगी पडणारे स्वछतेचे, आहार शास्त्र, कुटुंबीय जीवनाचे, अपत्य संगोपनाचे, सेवेचे ,नर्सचे शिक्षण त्यांना प्राधान्याने द्यावे. पण इंग्रजी शिक्षण त्यांना अगदी देऊच नये या मताचे गांधीजी नव्हते. स्त्रियांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाज कार्यासाठी करावा. समाजातील गरीबांची सेवा करण्यासाठी त्यांनी वाहून घ्यावे असे ते म्हणत. शिक्षण घेऊन स्त्रियांनी शोभेच्या बाहुल्या बनू नये. लग्न, संसार कुटुंबसंस्था यातच अडकून न पडता सार्वजनिक कार्यात स्त्रियांचा सहभाग कमी अधिक प्रमाणात असावा असे त्यांना वाटत असावे. शिक्षण घेऊन स्त्रियांनी पोटासाठी नोकरी करू नये किंवा व्यापार व्यवसायही करु नये. तर स्त्रियांसाठी असलेल्या क्षेत्रातच उत्तम कार्य करावे. स्त्रियांना व्यापक शिक्षण द्यावे. या मताचे ते होते पण जगाच्या प्रगतीला जर त्यांचे सहाय्य व्हायचे असेल तर ते पुरुषांची नक्कल करून जमणार नाही. त्यांनी स्पर्धा करावी पण नक्कल करून स्वतःची सर्वोच्च उंची बनणार नाही असे ते म्हणत. महात्मा गांधींनी भारतात आश्रम शाळा सुरू केलेल्या या आश्रमांमध्ये स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी खास वर्ग सुरू केले कस्तुरबा गांधी आश्रमातील शाळांवर विषेश लक्ष देत असत.विकेंद्रित अर्थव्यवस्थेत स्त्रियांचा मोठा सहभाग राहील हे ओळखून त्यांनी सुतकताई सारखे कार्यक्रम ग्रामीण भागातील महिलांना सुचविले आश्रमातही सूतकताई चे शिक्षण त्यांना देण्याची व्यवस्था करण्यात आली. आश्रम परिवारात दाखल झालेल्या स्त्रिया कस्तुरबा प्रमाणेच त्याग व सेवा समर्पित करण्यास कटिबद्ध झालेल्या असत गांधीजींच्या प्रेरणेने स्वदेशी चळवळ सूतकताई, खादी उद्योग, ग्रामोद्यो, दारुच्या गुत्त्यावर पिकेटिंग, राष्ट्रीय शिक्षण, आश्रमशाळा, सत्याग्रह यासर्व चळवळीत स्त्रिया अग्रभागी राहिल्या. म्हणूनच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाचा अधिकार असावा यासंदर्भात महात्मा गांधी म्हणतात

पूर्ण अर्थाने स्वराज्य हवे असेल तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणे आवश्यक आहे. अशा प्रकारे स्त्री शिक्षणामुळे कुटुंबाचा , समाजाचा व राष्ट्राचा विकास होईल. यावर म. गांधीजींचा विश्वास होता.

**स्त्री–पुरुष समानता** – स्त्रियांच्या समाजातील हीन आणि दुय्यम स्थानाच्या बाबतीत महात्मा गांधीजी म्हणतात की रूढी आणि कायदे बघता स्त्रियांचा दर्जा सर्वत्र हीन आहे आणि तो आमूलाग्र बदलण्याची गरज आहे. परंपरेविशयी ते म्हणतात कोणतीही गोष्ट प्राचीन आहे म्हणून ती चांगली आहे, असे मी म्हणत नाही. पुराण परंपरेपायी आपण आपली ईश्वरदत्त तर्कशक्ती गहाण टाकावी, असा मी आग्रह धरत नाही. कोणतीही रुढी कितीही जुनी पुराणी असली तरी नितीतत्वाशी तिचा विरोध असेल तर भूतलावरुन उच्चाटन होण्यास ती पात्र आहे. अशी परखड आणि निसंदिग्ध भूमिका गांधीजी घेतात. म्हणूनच महात्मा गांधींनी स्री स्वातंर्त्याचा आवर्जून पुरस्कार केला. महात्मा गांधी स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये समानता हवी या विचाराचे समर्थन करताना दिसतात. समाजातील स्त्रीच्या पारंपरिक कल्पनांचा ते धिक्कार करतात. स्त्रीला स्वतःचे व्यक्तिमत्व आहे. तिला पुरुषान इतकीच मानसिक शक्तीची देणगी निसर्गाकडून मिळालेली आहे. त्याग, सोशिकता, कष्टाळूपणा या बाबतीत ती पुरुषांपेक्षा काकणभर श्रेष्ठच आहे. तिलाही पुरुषांइतकेच अधिकार असले पाहिजेत. स्त्री ही पुरुषांच्या मालकीची भोगवस्तू नाही. आपण पुरुषांचे खेळणे आहोत, असे समजणे ही तिची मोठी चूक आहे. पुरुषांना संतुष्ट करण्यासाठी स्वतःचे शरीर भूशविणे तिला कमीपणा आणणारे आहे ,म्हणून स्वतः विषयीची न्यूनगंडाची भावना सोडून देऊन कुटुंबातील व समाजातील आपले स्थान मिळविण्यासाठी स्त्रियांनी पुढे आले पाहिजे.

स्त्रीच्या पारंपरिक दासी कल्पनेला विरोध करताना गांधीजी म्हणतात एखादी बाहुली अगर उपभोग साधन या ऐवजी नवग्रानी आपल्या पत्नीला समाजकार्यातील सन्मान्य सहचारिणी म्हणून वागवावे. शास्त्रांमधील स्त्रीप्रतिमेवर ते टीका करतात. महात्मा गांधीजींच्या पुढे सीता, दमयंती, द्रोपदी अशा स्त्रियांचा आदर्ष होता. त्यांच्यासारखे सामर्थ्य आणि आत्मसंचयन ज्या स्त्री जवळ असेल तिला समाजाकडून या स्त्रियांसारखाच मान मिळेल. स्त्रियांच्या उन्नतीतच समाजाची उन्नती आहे या मताचे गांधीजी होते. स्त्रियांना आवश्यक असेल तेथे सवलती मिळाव्यात असे आग्रही प्रतिपादन ते करतात. प्राचीन भारतीय समाजात मध्ययुगीन काळा सारखी स्त्रियांची परिस्थिती वाईट नव्हती. त्याकाळात खर्या अर्थाने स्त्रीला सामाजिक प्रतिष्ठा होती. आजच्या काळात स्त्री व पुरुषांचा दर्जा समान असावा असे महात्मा गांधींना वाटे. म्हणूनच ते म्हणतात ,भारतीय समाजाने विनाकारण स्त्रियांना हीनत्व दिले आहे. वास्तविक पाहता बुद्धी ,चातुर्य, कर्तव्य या बाबतीत स्त्री ही पुरुषांपेक्षा कमी नाही . तो जोपासला गेलेला एक न्यूनगंड प्रस्थापित झालेला आहे . तिची सामाजिक गुलामगिरी ही तिच्या मानसिक गुलामगिरीतून निर्माण झाली आहे. स्त्रियांनी जर गुलामगिरीतून मुक्त होण्याचे ठरवले तर त्यांना कोणीही रोखू शकणार नाही असे ते म्हणत. स्त्री स्वातंर्त्याचा विचार महात्मा गांधींनी समग्र परिवर्तनाची जोडलेला दिसून येतो. त्यासाठी सुशिक्षित भारतीय महिलांनी या विषमतेच्या कारणांचा विचार केला पाहिजे असे ते सुचवतात. तर दुसरीकडे पुरुषांमध्ये असलेली स्त्रीविषयी प्रभुत्वाची, स्वामित्वाची असलेली भावना नाहीशी होऊन स्त्रिया या आपल्या मित्र आणि सहकारी आहेत ही भावना वाढीस लागली पाहिजे . पुरुषाने स्त्रीवर जे अन्याय केले आहेत ते बघून महात्मा गांधींना वाईट वाटत असे. स्री आणि पुरुष एकच आहेत, म्हणून त्यांचे प्रश्न वेगवेगळे असता कामा नये, तेही एकच असले पाहिजे. हा स्त्री–पुरुष समतेकडे नेणारा मार्ग ते सांगतात. स्त्रियांची मानसिकता गांधीजी पूर्ण जाणून होते, तिच्या अंगभूत गुणांचा तिने अधिक विकास करावा. गरजा कमी करणे शारीरिक कष्टावर भर देवून पैशाची बचत करावी. असे अनेक गुण तिने कुटुंबात जोपासावेत ते तिचे कर्तव्यच आहे. एकदा तिने घराला वळन लावले की राष्ट्राला वळन लावणे अवघड जाणार नाही असे त्यांचे मत होते. अर्थात यावरून कोणी गांधीजी स्त्री स्वातंत्र्य विरोधी होते असा अन्वयार्थ लावू नये. कारण गांधीजी म्हणत सध्याचे युग हे स्त्री पुरुष समतेचे आहे. निसर्गाने स्त्री पुरुषांना परस्परांना पूरक केले आहे. अशा काळात स्त्री वर्गाला अपमानास्पद होणारा भेदभाव करणे हे काळाशी सुसंगत नाही. मुलगा जन्मला म्हणजे हर्षाने बेहोष व्हावे आणि मुलगी जन्मली म्हणजे शोक करीत बसावे याचे कारण काही माझ्या ध्यानात येत नाही दोन्ही ईश्वराची देणगी होय दोघांनाही जगण्याचा सारखा हक्क आहे आणि जगाची रहाटी चालू ठेवण्यासाठी दोघांचीही सारखीच गरज आहे, पुत्रा इतकाच वारसाहक्क कन्येला मिळावा , पतीची कमाई पती–पत्नीची समाईक जिंदगी होय. कारण घर काम करून पत्नी पतीला द्रव्यार्जनास मदत करीत असते . स्त्री–पुरुषांच्या वेतनात विषमता असू नये. पुरुषांचे स्त्रीवरील प्रभुत्व संपुष्टात आले पाहिजे. वरील वाक्य वाचताना हा स्त्रीमुक्तीवादी संघटनेने धरलेला आग्रह आहे वा युनो या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या जाहीरनाम्यातील घोषणा आहे असे वाटेल परंतु वरील सर्व विधाने महात्मा गांधीजी ची आहेत आणि जाहीरनाम्यामध्ये नंतरच्या काळात आली आहेत. वरील वाक्यावरून स्त्रियांच्या समाजातील हीन आणि दुय्यम स्थानाच्या बाबतीत गांधीजींचे विचार किती सुधारित आहे हे आपल्या सहज लक्षात येते. स्त्री–पुरुष समानतेचा विचार महात्मा गांधींनी केलेला दिसून येतो . शिक्षणात स्त्री–पुरुष समानतेचा विचार येणे गांधीजींना महत्त्वाचे वाटत होते. गांधीजींनी प्राथमिक शिक्षणासाठी एक बालपोथी तयार केली होती , जी आज अडगळीत पडलेली असेल पण स्त्री–पुरुष समानतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. आई आणि मुलाचा संवाद रुपात असलेल्या या बालपोथीतील एक पाठ घरकाम या विषयावर आहे .जितकी गरज घर काम शिकण्याची ताईला आहे, तितकीच तुलाही आहे असा आशय असलेली बालबोधा पोथी 1922 मध्ये महात्मा गांधींनी लिहून ठेवलेली आहे. थोडक्यात गांधीजींना शिक्षणात असा बदल अपेक्षित होता की अभ्यासक्रमातून

स्त्री पुरुष समानतेचे धडे असावेत जेणे करून स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. तत्कालीन शारदा बिलाला होणाऱ्या विरोधा बाबत गांधीजी म्हणतात मी स्त्री वर्गाच्या हक्काच्या बाबतीत कसलीही तडजोड करायला केंव्हाही तयार नाही. अशी स्पष्ट भूमिका घेतली यावरून महात्मा गांधीजींची स्त्रीवादी भूमिका अधिक स्पष्ट होते. थोडक्यात स्त्री आणि पुरुष एकच आहेत, म्हणून त्यांचे प्रश्न वेगवेगळे असता कामा नये. तेही एकच असले पाहिजेत. हा स्त्री पुरुष समतेकडे नेणारा मार्ग महत्त्वपूर्ण असल्याचेच दिसून येते.

**आर्थिक स्वावलंबन** – आर्थिक बाबतीत स्त्रिया स्वावलंबी व्हायला हव्यात असे म. गांधींचे मत होते. महात्मा गांधीजींनी स्वदेशीचा पुरस्कार केल्याने हे स्वदेशी आंदोलन अधिकाधिक गतिमान करण्यासाठी आणि जनतेमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करण्यासाठी खादी आंदोलन सुरू केले. सूतकताई, खादी उद्योग याकडे महिलांना वळविले . महिलांना काही प्रमाणात काम धंदा मिळेल आणि पतीच्या अर्थार्जनात त्यांना काही वाटा उचलता येईल. तसेच काही प्रमाणात आर्थिक दृष्ट्या त्या स्वावलंबी होतील. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग दक्षिण आफ्रिकेतील लढ्यात स्त्रियांच्या निर्भय सहभागाचा मोठाच प्रभाव महात्मा गांधीजींवर पडला त्यानंतर भारतात परतल्यावर भारताच्या स्वातंत्र चळवळीत महिला मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्यासाठी महात्मा गांधीजींनी लेखन व भाषणाद्वारे स्त्रियांना आवाहन केले. महात्मा गांधींनी स्त्रियांच्या संदर्भात असा विश्वास व्यक्त केला होता कि स्त्री त्याग आणि शांती ची मूर्ती आहे आणि युद्धसंस्था नष्ट करून जगात शांतता निर्माण करण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी आहे. गांधीजींनी केलेल्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागातून त्यांचा हा विश्वास दृढ झाला होता आणि त्यांचा हा विश्वास अनाठायी नव्हता याचे अलीकडचे उदाहरण पुलावामा येथील दहशतवादी आत्मघाती कृ त्याच्या पार्श्वभूमीवर काही वर्तमानपत्रात मध्ये काही वीरमाता, वीरपत्नींनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या अंतमुर्ख करणाऱ्या आहेत. युद्ध नको शांतता हवी दोन राष्ट्रातील प्रश्न संवादाने सुटावेत. शहीद बबलू संतराच्या पत्नीचे हे वाक्य तर तिकडे पाकिस्तानातही युद्ध विरोधात शांततेसाठी मोर्चे, सभा यामध्ये तेथील स्त्रिया सहभाग घेताना दिसत आहेत. शांततेची वैष्विक भूमिका या स्त्रिया मांडत आहेत शांततेच्या या त्या प्रतिनिधी आहे एका अर्थाने गांधीजी स्त्रियांवर दाखवलेला विश्वास सार्थ होता असेच दिसत आहेगांधीजींच्या विचारांचे जागरण किती अपरिहार्य आहे याची जाणीव होणे महत्त्वाचे आहे. महात्मा गांधींनी स्त्री स्वातंत्र्याचाही आवर्जून पुरस्कार केला स्त्री–पुरुष समान आहे स्त्रियांना मानसिक शक्ती निसर्गाकडून मिळालेली आहे तरीही अहिंसक लढा देण्यासाठी अधिक सक्षम आहे अशी त्यांची धारणा होती हिंदू धर्मात देवीच्या मंदिरांची संख्या खूप आहे पण महिलांवर अत्याचार करण्यात हिंदूधर्मीय पुरुशही आघाडीवर आहे .म्हणूनच हे मान्य नसणाऱ्या गांधीजींनी स्त्रियांना निर्भय करून त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांचा स्वातंर्त्र्य चळवळीत समावेश केलेला दिसून येतो. महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्वदेशी चळवळ, सूतकताई, खादी उद्योग, ग्रामोद्योग, दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग, राष्ट्रीय शिक्षण, आश्रमशाळा, सत्याग्रह या सर्व चळवळीत अग्रभागी राहिल्या. स्वातंत्र चळवळीच्या काळात कमलादेवी चटोपाध्याय, हंसाबेन मेहता, अवंतिकाबाई गोखले, स्वरूपाराणी नेहरू, प्रेमाताई कंटक, ताराबाई लिमये, दुर्गाबाई जोग यांनी असहकार सत्याग्रह चळवळीत हिरीरीने भाग घेतला. स्त्रियांमध्ये जन्मजात असलेल्या सहनशक्ती, सोशिक वृत्तीने हजारो स्त्रियांनी स्वातंत्र्य लढ्यातील हाल–अपेष्टा सहन केलेल्या दिसून येतात . 1942 चळवळीत अरुणा असफअली, उशा मेहता, सुशीला नायर, लक्ष्मीबाई पाध्रीकर, कमलाबाई देसाई, पार्वतीबाई परांजपे यांचे योगदान महत्वाचे आहे. संपूर्ण सत्याग्रह पर्वात डॉ. सरोजनी नायडू यांचे कर्तृत्व तर पहाडा प्रमाणे उंच आहे गांधीजींच्या आवाहनाला स्त्रियांनी खेडोपाडी शहरा शहरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिलेला दिसून येतो चरखा चलाचला के लेंगे स्वराज्य हे त्यांचे घोषवाक्य होते. भारतीय स्त्रीच्या जीवनातील हे परिवर्तन पाहून पाश्चात्त्य जगाची जनताही प्रभावित झाली. स्त्रियांच्या सहभागाने पुरुषांनाही मोठा उत्साह निर्माण झाला. महात्मा गांधीजींच्या प्रभावामुळेच 1926 च्या निवडणुकीत स्त्रियांनी मतदान केले. मद्रासच्या सर्वप्रथम महिला डॉक्टर मुथुलक्ष्मी रेड्डी कौन्सिल मध्ये गेल्यावर महिलाविषयक अनेक कायद्यांसाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. मुंबईच्या मिठूबेन पेटीट व भानुबेन देसाई यांनी मुंबईच्या सत्याग्रह चळवळीत भाग घेतला बारडोली सत्याग्रहातर स्त्रियांच्या शक्तीचे अद्भुत दर्शन झाले. महाराष्ट्रीय स्त्रियांबद्दल गांधीजींनी काढलेले उदगार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत ते म्हणतात मनमोकळेपणा आचार गौरव, वर्तन स्वातंत्र्य हे गुण नम्रतेसह महाराष्ट्रीय महिलांमध्ये असतात. महात्मा गांधींनी स्त्रियांमध्ये धैर्य, यातना सहन करण्याची शक्ती, निर्भयता, सर्वस्व झोकून देण्याची वृत्ती निर्माण केली. परिणामी प्रचंड संख्येने स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या दिसतात. गांधीयुग खऱ्या अर्थाने स्त्रीयांच्या मुक्तीचे युग होते. स्त्रिमुक्तिची ती सुरुवात होती. त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणूनच सरोजनी नायडू म्हणतात चमत्काराचे युग संपले आहे असे कोण म्हणतो? या माणसाच्या रुपाने प्रत्यक्ष चमत्कार आपल्यात वावरत आहे ते आम्हा स्त्रियांचे पुढारी, मित्र आहेत. तसेच पिताश्रीही आहेत. सार्वजनिक, राजकीय जीवनात स्त्रियांचा सहभाग असणे आवश्यक आहे. महात्मा गांधीजींच्या या भूमिकेमुळे स्वातंत्र चळवळीतील सरोजिनी नायडू, अरुणा असफ आली, कस्तूरबा गांधी विजयालक्ष्मीपंडीत, अवंतिकाबाई गोखले, दुर्गाबाई देशमुख राजकुमार अमृत कौर, बिबि अमतुस्सलाम कमला नेहरू यांच्यासह हजारो महिला आघाडीवर होत्या विदेशी कापडाची होळी करता नाही स्त्रिया मोठ्या प्रमाणात आघाडीवर असलेल्या दिसून येतात. महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेचे उत्तम उदाहरण म्हणजे ते केवळ बोलूनच दाखवत नव्हते तर स्त्रीसमर्थ, नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता. त्याचेच प्रतीक म्हणजे त्यांनी कॉंग्रेस मध्ये महिला नेतृत्वाला संधी दिली. वेगवेगळ्या आंदोलनात त्यांना

मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले. तसेच सामाजिक शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांना मोठ्या प्रमाणात सहभागी होता आलेले दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे संविधान समितीतही महिलांचा समावेश होता. या सर्व महिला देशाच्या स्वातंत्र्य चळवळीशी जोडलेल्या होत्या. आज स्त्रियांच्या हक्कासाठी अनेक स्त्री संघटना कार्यरत आहे. गांधीजींच्या विचारांचे विश्लेषण स्त्रीद्यांकडून केले जात आहे. काही प्रमाणात ते गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर टीका करताना दिसतात. स्त्रीमुक्तीवादाच्या मते गांधीजींच्या विचारसरणीत स्त्रीस्वातंत्र्याला आणि स्त्री–पुरुष समानतेला खऱ्या अर्थाने स्थान नव्हते. ते शेवटी पितृसत्ताक मूल्याचे पुरस्कर्ते होते. गांधीजींच्या चळवळीत भाग घेणाऱ्या स्त्रिया केवळ उच्चवर्णीय, सुशिक्षित होत्या. दलित किंवा इतर मागास स्त्रियांचा त्यात कमी सहभाग दिसतो. तसेच गांधींच्या काळातील स्त्रीयांना स्वतःची आपल्या हक्काची फारशी जाणीव नव्हती. त्याग व समाजसेवा हेच तिचे ध्येय होते. गांध ीजींनी स्त्रिया बाबत मांडलेले विचार हे तत्त्व मूल्यांची चौकट मोडून प्रत्यक्ष कृतीद्वारे स्त्रियांच्या मुक्ती चळवळीची प्रयत्न करणारा विचार त्यात दिसत नाही. अशा प्रकारची टिका गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर केली जाते. पण याबाबत असे म्हणता येईल की ज्या काळात गांध ीजींनी स्त्रीवादी विचार मांडला त्या काळात स्वराज्य मिळवणे हे स्वातंत्र आंदोलनाचे मुख्य उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य चळवळ अंतिम टप्प्यात येऊन पोहोचली होती. त्यामुळेच स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्यपेक्षा गांधीजींना पुरुषांना पूरक होईल असेच सुधारणावादी विचार मांडताना दिसतात. कदाचित स्वातंत्र्य व समता या बाबतच्या अतिरेकी कल्पनामुळे ही टीका होत असावी. गांधीजींना हरिजन स्त्रियांबद्दल अपार सहानुभूती होती. म्हणूनच त्यांच्या उद्धारासाठी ते कटिबद्ध झालेले दिसतात. अनेक अस्पृश्य स्त्रियाही आंदोलनात सहभागी होत्या. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान कोणाला करावे? याविषयी आपले वैयक्तिक मत नोंदविताना म्हणूनच ते म्हणतात स्वतंत्र भारताची पहिली पंतप्रधान एक हरिजन स्त्री असावी या त्यांच्या उद्गगारातच त्यांची दलित वर्गाबद्दलची भूमिका दिसून येते. थोडक्यात स्यियांमध्ये आत्मविश्वास जागृत करणे त्यांना धैर्यशील बनवणे सर्व समस्या निवारणासाठी संघर्षशील बनवणे यासाठी महात्मा गांधी प्रयत्नशील होते . स्त्रियांच्या सर्वांगीण शोषणाविरुद्ध लढ्याला स्त्रीला सिद्ध करणे हाच गांधीजींचा स्त्रीमुक्तीचा मार्ग होता.

**निष्कर्श** – महात्मा गांधींच्या स्त्रीवादी भूमिकांमुळे स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली. स्त्री शिक्षणाला गती प्राप्त झाली. महात्मा गांधीजींची स्त्रीवादी भूमिका स्पष्ट व महत्त्वपूर्ण होती. स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित होण्यास मदत झाली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री सहभागामुळे राष्ट्रीय चळवळ खऱ्या अर्थाने राष्ट्रीय व व्यापक बनली.

***संदर्भ***


1. *धर्माधिकारी (संपादक ),गांधी विचार दर्शन, खंड 6, पृ क्रमांक 173, नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद.*
2. *नवलगुंदकर षं.ना., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, पृश्ठ क्रमांक 43 ,नरेंद्र प्रकाषन, पुणे.*
3. *धर्माधिकारी तारा (संपादक), स्वातंत्रलढ्यातील स्त्री पृ क्रमांक 87, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती,मुंबई. 1992.*
4. *हरिजन साप्ताहिक, 23 मे 1936,पृष्ठ क्रमांक,117.*
5. *गांधीजीमहात्मा,माझ्या स्वप्नाचाभारत ,पृष्ठ क्रमांक81*
6. *हरिजन सप्ताहिक 23मे 1936 पष्श्ठ क्रमांक 117*
7. *धर्माधिकारी दादा,(संपादक),गांधी विचार दर्शन, शिक्षण खंड 6, पृष्ठ क्रमांक 173 नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद*
8. *गांधी मोहनदास करमचंद ,माझ्या स्वप्नांचा भारत, पृष्ठ क्रमांक 84 85*
9. *पाटील डी .आर., (संपादक) महात्मा गांधी विचार व समकालीन समाज, पृष्ठ क्रमांक 105*
10. *पंडित नलिनी ,गांधी ,पृष्ठ क्रमांक 221*
11. *गांधी मोहनदास करमचंद, माझ्या स्वप्नांचा भारत, पृष्ट क्रमांक 82*
12. *हरिजन साप्ताहिक ,17 ऑक्टोबर 1929, पृष्ट क्रमांक 343*
13. *हरिजन साप्ताहिक, 2 डिसेंबर 1939, पृष्ठ क्रमांक 359*
14. *लोकसत्ता 2019 लेख रजिया पटेल*
15. *सुरजीत कौर जौली, गांधी एक अध्ययन, पृष्ठ क्रमांक 293 संपूर्ण गांधी वांड्मय खंड 21 पृष्ठ क्रमांक 130*
16. *दैनिक केसरी, पुणे, 15 सप्टेंबर 1942, पृष्ट क्रमांक 6*
17. *धर्माधिकारी तारा,संपादक, आगस्ट क्रांती महोत्सव, समिती, मुंबई 1992 वातंत्र लढ्यातील सरली, पृष्ठ क्रमांक 34 35*
18. *शिखरे दा.न., (संपादक) महाराष्ट्र व महात्मा गांधी, पृष्ठ क्रमांक 108*
19. *किराणे बापू ,असे होते बापू ,पृष्ठ क्रमांक 88*
20. *शरद पाटील,(संपादक), स्री मुक्ती विषेशांक, पावडे कुमुद, स्वातंत्र्य पूर्व दलित चळवळ व स्त्री मुक्ती चळवळ, धुळे 1985, पृष्ठ क्रमांक 38.*